Estd 1962
NAAC 'A' Grade,

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व विभाग/अधिविभागांना आदेशान्वये कळविणेत येते की, कोविड-19 च्या संसर्गजन्य रोगामुळे सन 2020-2021 या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय काटकसरीच्या उपाययोजना करणेसंदर्भात महाराष्ट्र शासन वित्त विभागाचा दिनांक 4 मे, 2020 रोजीचा शासन निर्णय प्राप्त झाला आहे त्यास अनुसरून वित्त व लेखा समितीने, समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेने स्वीकारल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1) सर्व विभाग/अधिविभागांनी सन 2020-21 मधील अंदाजपत्रकातील प्रस्तावित योजनांचा/बाबींचा 50% तरतूदीच्या प्रमाणात आढावा घ्यावा व जेवढया योजना रद्द अथवा स्थगीत करता येण्यासारख्या आहेत त्या रद्द अथवा स्थगीत करण्यात याव्यात. विद्यमान तरतूदीमध्ये बचत करण्याच्या दृष्टीने प्राधान्याने उपाययोजना कराव्यात.

2) जो खर्च करणे अत्यावश्यक आहे अशा बाबींचे प्रस्ताव संबधीत विभागामार्फत व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर करण्यात यावेत.

3) विविध फंडींग एजन्सीकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या निधीच्या मर्यादेतच खर्च करण्यात यावा. On account खर्चावर सध्या प्रतिबंध घालण्यात येत आहे. (D.1.P.99 हे शिर्षक वगळून). तथापी फेलोशिपच्या रकमा पूर्वीप्रमाणेच On account देणेत याव्यात.

4) सन 2020-21 मध्ये कोणत्याही नवीन योजनेवर खर्च करण्यात येवू नये अथवा प्रस्तावित करण्यात येवू नयेत.

5) विद्यापीठ निधीतून वेतन अथवा निवृत्तीवेतनाचा खर्च हा मंजूर तरतूदींच्या मर्यादेत करण्यात यावा.

6) तरतूद उपलब्ध नसताना किंवा On Account किंवा Subject to Receipt कोणताही खर्च करण्यात येवू नये.

7) विभाग/अधिविभागांनी कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देवू नये फर्निचर खरेदी, झेरॉक्स मशीन, संगणक उपकरणे, नैमित्तीक कार्यशाळा, सेमिनार, भाडयाने कार्यालय घेणे इत्यादी खर्चावर सध्या प्रतिबंध आणण्यात येत आहे. असे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करू नयेत.

8) आरोग्यविषयक अत्यावश्यक बाबींच्या खरेदीसाठी मंजूर तरतूदींच्या मर्यादेत खर्चास मान्यता देण्यात यावी.

9) चालू आर्थिक वर्षात Recurring Expenditure मधील खर्चासाठी (P.6 पासून पुढील) मंजूर तरतूदींच्या 50% मर्यादेत अनुमती राहील. खर्चात काटकसर होण्याच्या दृष्टीने कंत्राटी कर्मचारी संख्या मर्यादीत राहील याची आस्थापना विभागाने दक्षता घ्यावी.

10) कोरोनामुळे उद्भवलेली परिस्थिती हाताळण्याच्या अनुशंगाने इमारती बांधकामे इ. तूर्त स्थगीत करण्यात येत आहेत.

11) बांधकाम विभागाने पुढील आदेशापर्यंत कोणतेही बांधकाम हाती घेवू नये (तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, निविदा, कार्यारंभ आदेश देवू नयेत). ज्या अधिका-यांना तांत्रिक मान्यता देण्याचे प्राधिकार आहेत त्यांना निर्देशित करण्यात येते की, चालू वित्तीय वर्षात कोणत्याही तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येवू नयेत. मात्र कार्यारंभ आदेश दिलेली व सुरू असलेली कामे चालू राहतील. तसेच विभागांनी फक्त मान्सूनची पूर्वतयारी करण्याच्या अनुषंगानेच नवीन कामे हाती घ्यावीत.

12) सन 2019-20 या आर्थिक वर्षातील प्रलंबित देयके सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून भागविता येतील. तथापि हा खर्च देखिल कपातीनंतर उपलब्ध तरतूदीतूनच भागवावा.

13) घसारा निधी व संशोधन व विकास निधी अंतर्गत बांधकाम विभागाने सादर केलेल्या कामापैकी अत्यावश्यक कामांना मान्यता देण्यात आली.

14) उपरोक्त उपाययोजनाचे सर्वांनी कसोशीने पालन करावे.

वित्त व लेखा अधिकारी

अंदाजपत्रक विभाग/No.113
दिनांक:- 07-08-2020
07 AUG 2020